# पणन संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे

**नवीन मध्यवर्ती इमारत, तिसरा मजला, पुणे-४११ ००१.**

पीबीएक्स-०२०-२६१२६६२८/२६४२६७८५/२६११४०६४

Email-dirmktms@gmail.com


---

जा.क्र.पणन-५/स्थापत्य/ ऑनलाईन १२ (१)प्रस्ताव /२०२० /२०५ दिनांक :-२०/१ /२०२०

## प रि प त्रक

**विषय:-ऑनलाईन कलम १२ (१) प्रणाली बाबत.**

संदर्भ:- १) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचे पत्र क्र.
कृपमं-१०१८/प्र.क्र१६९/२१-स,दिनांक १५/११/२०१८ (अधिसुचना)

२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.स्था/ऑनलाईन कलम १२ (१) प्रस्ताव/ २०१९, १२४७, दिनांक ३०/३/२०१९

संदर्भिय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्राने शासनाने महाराष्ट्र कृषि उत्पनन पणन (प्रचालन व सुविधा ) अधिनियम १९६३ मधील कलम ५८ अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन पणन संचालक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक व उप /सहाय्यक निबंधक या अधिका-यांना खालील प्रमाणे अधिकार प्रदान केलेले आहेत.

| अ.क्र (१) | पदनाम (२) | प्रदान करण्यात आलेले अधिकार (३) |
|---|---|---|
| १ | पणन संचालक | रु.५० लाखाचे वरील स्थावर व रु.१० लाखावरील जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |
| २ | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था | रु.२५ लाखावरील ते रु.५० लाख पर्यंतचे स्थावर व रु.५ लाखावरील ते रु.१० लाखापर्यंतचे जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |
| ३ | जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था | रु.१० लाखावरील ते रु.२५ लाख पर्यंतचे स्थावर व रु.१ लाखावरील ते रु.५ लाखापर्यंतचे जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |
| ४ | उप/ सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था | रु.१० लाख पर्यंतचे स्थावर व रु.१ लाखपर्यंतचे जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |

पणन मंडळाच्या संगणक विभागाने विकसीत केलेल्या ऑनलाईन कलम १२ (१) संगणक प्रणाली मध्ये सध्या कार्यरत असलेल्या प्रणालीद्वारे उपलब्ध असलेल्या कामाचे स्थावर व जंगम मालमत्ता वर्गीकरण करण्यासाठी व सहाय्यक निबंधक यांना नव्याने मंजूरी अधिकार उपलब्ध करण्यासाठी सदर प्रणालीमध्ये बदल करुन दिनांक १/४/२०१९ पासून नवीन संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. कायदा कलम १२ (१) चे प्रस्ताव सर्व बाजार समित्यांनी ऑनलाईन प्रणालीमध्ये सादर करणे बंधनकारक आहे . क्षेत्रिय स्तरावरील सर्व अधिका-यांना सूचित करण्यात येते की ,ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर न केलेले कोणतेही कलम १२ (१) प्रस्ताव स्विकारु नयेत. तसेच ऑनलाईन आलेले प्रस्ताव विहीत मुदतीत संबंधित कार्यालयाने निकाली काढावेत .विहीत मुदतीत निकाली न काढलेले प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीद्वारे नजीकच्या वरिष्ठ कार्यालयाकडे वर्ग होतील व त्यास संबंधित कार्यालय प्रमुख जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. जर सदर प्रस्ताव पुढील कार्यालयास वर्ग करावयाचा असल्यास आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव पुढील कार्यालयाकडे वर्ग करणे बंधनकारक आहे. अशा सुचना या कार्यालयाने दिनांक ३०/३/२०१९ चे पत्राने सर्व विभागीय , जिल्हा , उपनिबंधक , सहाय्यक निबंधक व बाजार समिती यांना दिलेल्या आहेत. तरी या सुचनांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही असे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

आपल्या कार्यालयाकडून ऑनलाईन आलेले प्रस्ताव विहीत मुदतीत संबंधित कार्यालयाने निकाली काढलेले नसल्याने किंवा सदर प्रस्ताव मंजूरी नंतर प्रस्ताव ऑनलाईन प्रणाली मधुन कमी न केल्याने सदरचे सर्व प्रस्ताव या कार्यालयाच्या स्तरावर दिसत आहेत. तरी आपणास पुन्हा कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयाकडून मंजूर केलेले कलम १२ (१) प्रस्ताव दिनांक ३१/१/२०२० पुर्वी निकाली काढावेत व तसे या कार्यालयास अवगत करावे म्हणजे या कार्यालयाची प्रतिक्षायादी कमी होईल.

( डॉ.आनंद जोगदंड )
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य,पुणे

प्रति,

१)विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व )
२)जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था (सर्व)
३)उपनिबंधक/ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था( सर्व )
४)सभापती / सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)